Vol 4 Issue 7 August 2014

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-7 | Aug-2014
Available online at www.isrj.net

# संत नामदेवांची विठ्ठलभक्ती

प्रा.डॉ. आय. जे. तांबोळी

प्रमुख, मराठी विभाग , एस.एस.ए. आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर.

**सारांश :-**

श्री संत नामदेव हे गेल्या सत षतकापासून मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासात गाजत आहेतत्र ज्या भागवत धर्माची पायाभरणी ज्ञानेश्वरांनी केली त्या भागवत धर्माला सर्वदूर पोहचवण्याचा प्रयत्न नामदेवांनी केला नामदेवांनी 80 वर्षाच्या प्रदीर्घ आयुष्यात मानवी जीवनाची व नशीबाची विविध स्थित्यंतरे पाहितीत.

### प्रस्तावना :–

संत नामदेव हे श्रोत्यांना कीर्तनात, भक्तीरसात चिंब भिजवणारे पहिले किर्तनकार, वारकरी संप्रदायाचे पहिले प्रचारकही तेच, हिंदी भाषेत पद्यरचना करून विठ्ठलभक्ती सांगणारे पहिले महाराष्ट्र कवी हे नामदेवच. नामदेवांएवढा विठ्ठलआप्त संत दुसरा दाखवता येणार नाहीत्र नामदेवांच्या समग्र जीवनाला अर्थ प्राप्त करून देणारा देव म्हणून विठ्ठलाचे नाव घ्यावे लागेल. विठ्ठलनामक भक्ति नामदेवांनी आपल्या प्रांताच्या सीमारेषा ओलांडून उत्तर हिदुस्थानात पंजाबपर्यंत पोहचविले. त्यांचे हे कार्य थक्क करणारे आहे. नामदेवांची विठ्ठलभक्ती व अभंगवाणी ही केवळ वारकरी संप्रदायापुरतीच मर्यादित राहिली नाही, तर तिने सर्वांनाच भारावून टाकले.

भारतीय लोकजीवनांत समता आणि एकात्मता प्रस्थापित करण्याचे महान कार्य संतश्रेष्ठ नामदेवांनी इ.स. 13 व्या शतकात केले. त्यांची हिंदी पदे 'ग्रंथसाहेब' या शीखांच्या धर्मग्रंथात आहेत. कथाकाव्ये, आख्याने, चरित्रे, आत्मचरित्रे, प्रवासवर्णन इ. प्रकारच्या वाङ्‌मय प्रकारातून त्यांनी विठ्ठलभक्ती सांगितली आहे. श्री ज्ञानेश्वरादि भावंडांचा सहवास व विसोबा खेचरांचे शिष्यत्व या दोन घटना त्यांच्या जीवनात महत्वाच्या ठरल्या.

### बालभक्त नामदेव :–

नामदेवांना लहानपणापासूनच नामस्मरण, विठ्ठलभक्ती व अध्यात्माची आवड होती. त्यांच्या घरात विठ्ठलभक्ती पूर्वापार चालत आलेली होती. पूजेनंतर प्रसादाच्या वाटीतील दूध प्याल्यावाचून हालणार नाही, असा हट्ट करून बसणारे बालभक्त नामदेव आणि त्यांचा निरागस बालहट्ट पुरविणार विठ्ठल यांचे परस्परातील नाते पुढे विकास पावत गेले.

### अद्‌भुत भक्तिभाव :–

शिंपीयाचे कुळी जन्म झाला ।
पर हेतु गुंतला सदाशिवी ।।
रात्रिमाजी शिवी दिवसामाजी शिवी ।
आराणूक जीवी नोव्हे कदा ।।

नामदेवांचा भक्तिभाव खरोखर अद्‌भूत आहे. कारण भगवंताचे नामस्मरण करणाऱ्या ह्या नामदेवांनी साधा भोपळेपणानी शिंपी कामात मग्न असतानाही त्यातील वस्तुच्या वापराने आपल्या भगवतांची सेवा करताना दिसतो. त्यांनी मनाने ईश्वराची प्रार्थना केली. तसेच जिभेची कात्री करुन ईश्वराची आराधना केली. यमाचा पाश तोडून हरिनामाचा उच्चार करायला सांगतात. त्यांच्या चित्ताला विठ्ठलरुप सदाशिवाचे वेध लाभलेले आहे.

### विठ्ठलाची मानसचित्रे :–

विठ्ठलभक्तीत रमलेल्या आणि विठ्ठलाशी एकाकार पावलेल्या नामदेवांनी आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत आपल्या

अभंगातन साकार केलेली मानसचित्रे विठ्ठलभक्तीतूनच निर्माण झाली आहेत.

डोळुले सिणले पाहता वाटुली ।
अवस्था दाटली ह्रदयामाजीं ।।

असे अंतःकरण पिळवटून टाकणारे शब्द नामदेवाच्या तोंडून बाहेर पडतात. कटीवर कर ठेवलेली वत्सलमूर्ती पाहण्यासाठी नामदेवांचे मन झुरु लागले तेंव्हा ते म्हणतात

तुझिया चरणाचे तुटतां अनुसंधान।
जाती माझे प्राण तत्क्षणी ।।
अशा प्रकारी त्यांच्या मनाची अवस्था ते आवर्जून सांगातात.
पतित पावन ना ऐकुनि आलों मी व्दारां।
पतित पावन नव्हेसी म्हणुनी जातों माघारा ।।

असा लटका रुसवा नामदेव व्यक्त करतात. विठ्ठलविषयक असीम भक्तीतून विठ्ठलाला सुनावण्याचा अधिकार नामदेवांनी प्राप्त करुन घेतला.

विठ्ठलाला रागवणारे, फैलावर घेणारे, त्याच्यावर रुरसणारे, त्याला बजावणारे व त्याच्याशी भांडणारे पहिले कवी संत नामदेव.

तुझा माझा देव कां रे वैराकर ।
दुःखाचे डोंगर दाखविशी ।।

असे रोखठोक प्रश्न विचारण्याची ताकद नामदेवांना विठ्ठलभक्तीतूनच लाभली आहे. विठ्ठलाकडे मातेची भुमिका देऊन स्वतःकडे बालकाची भूमिका घेणे नामदेवांना अतिशय आवडते. त्यामुळे त्यांच्या अभंगात माऊली–तान्हा, गाउली–वासरु, हरिणी–पाडस, पक्षिणी–अंडज, कासवी तिचे बाळ या प्रतिमा येतात.

जीव तूं प्राण तूं ।आत्मा तूं गा विठ्ठला ।
विठ्ठल हेच त्यांचे जीवन आहे.

***नामदेव – विठ्ठल संबंध :–***

नामदेवांचे विठ्ठलप्रेम केवळ अपूर्वच म्हणावे लागेल. नामदेव हे विठ्ठल विरहाने व्याकूळ होतात, विठ्ठल भेटीसाठी तळमळतात व म्हणतात की,

विठ्ठल हा ध्यानी, विठ्ठल हा मनी
विठ्ठल चिंतनी रात्रंदिवस।।

नामदेवांचा विठ्ठलही नामदेवांप्रमाणेच त्यांच्या सादाला प्रतिसाद देताना आढळतात हे पाहून आश्चर्य वाटते. विठ्ठलाला सर्व संत प्रिय होते पण संत नामदेव हे सर्वात लाडके होते.

केशव म्हणे नाम्या खंती वाटे माझ्या मनी।
निद्रा न लगे नयनी पाहतां वाट।।
तुजविण उदास ही पंढरी।
न पडे क्षणभरी विसरु तुझा।।

विठ्ठल हे देखील नामदेव विरहाने उदास झाले आहेत. नामदेव–विठ्ठल संबंध यास केवळ भक्तीमुळेच मानवी रुप लाभत आहे. नामदेवांची विठ्ठलभक्ती ही असामान्य आहे.

***विटेवर साकारले ब्रम्ह :–***

सुखांचे हे सुख श्रीहरिमुख।
पाहताही भूक तहान गेली।।
भेटली भेटली विठाई माऊली।
वासना निवाली जीवांतील।।
चंद्रासी चकोर मेघासी मयूर।

वाटे तैसा भर आनंदाचा।।
नामा म्हणे पाप आणि ताप, दु:ख।
गेले झाले सुख बोलवेना।।

विठ्ठल हा भक्तसखा आहे तो भक्तीला भुलतो असे नामदेवाचे मत आहे. श्रीहरिच्या दर्शनाने आपल्याला झालेला असीम आनंद नामदेवांना या अभंगात बहारीनं वर्णन केला आहे. ते पाहता माझी तहान आणि भूक हरपून जाते. श्री विठ्ठलाच्या ठिकाणी मला श्रीहरिचं म्हणजे श्री विष्णुचंच दर्शन घडतं. विठाई भेटली म्हणजे पाप, ताप व दु:खही सारी नाहीसी होतात. चंद्रचकोर व मेघाने मयूर कसा आनंदीत होता तसा आनंदाचा भर वाटत आहे असे नामदेव म्हणतात. नामदेवांचा विठ्ठलविषयक अनुभव हा केवळ भक्तिगत स्वरुपाचा आणि सर्वस्वती भावनिक पातळीवरील तीव्रतेच्या जोरावर त्यांनी अनुभवला आहे.

***नामदेवांची अभंगवाणी :—***

संत नामदेवांनी शतकोटी अभंग रचना करण्याची प्रतिज्ञा केली होती. परंतू, 2375 इतके अभंग करु शकले त्यांनी 17 भूपाळ्या व आरत्या रचल्या. भक्तीपर गीतेही त्यांनी सादर केली.

घालीन लोटांगण वंदिन चरण।
डोळ्यांनी पाहीन रुप तुझे।।
प्रेमे अलींगन अनंत पूजीन।
भावे ओवाळीन म्हणे नामा।।

प्रस्तुत आरतीमध्ये नामदेवांनी भक्तीने विठ्ठलास आळवले आहे. नामदेव म्हणतात, हे विठ्ठला मी लोटांगण घालून तुझ्या पावलांना नमस्कार करीन व तुझे रुप मी डोळे भरुन पाहीन. भक्तीभावाने अलिंगन देऊन, पुजा करीन. आजही घराघरात आणि प्रत्येक देवळात या आरतीवाचून पूजेची समाप्ती होत नाही.

***भक्तांचा कैवारी :—***

विठ्ठल हा भक्तांचा कैवारी आहे, 'जगी ज्यास कोणी नाही त्यास देव आहे', असे संत नामदेव म्हणतात. तसेच ते विठ्ठलाला प्रेमाने 'काळा दादुला' असे म्हणतात. दादुला म्हणजे दांडागा, या शब्दांनी विठ्ठलाचे प्रचंड सामर्थ्य प्रकट झाले आहे. हा दादुला काळा आहे पण जवळुन पाहिलयावर त्याच्या काळेपणाचे सुनील सौंदर्य लक्षात येते.

पंढरपूर येथे माझा मायबाप आहे, असे ते निश्चयाने म्हणतात. एक प्राकरची निर्भयवृत्ती विठ्ठलाच्या भक्तीमुळे त्यांच्या मनात सातत्याने भरुन राहते. नामदेवांच्या आर्त विनवणीला प्रतिसाद देण्यासाठी जेंव्हा विठ्ठल गरुडावर बसुन येतो तेंव्हा नामदेवांच्या डोळ्याशी एकरुप होतो.

अशा शब्दांत नामदेव आपला अनुभव सांगातात. विठ्ठलभक्तीमुळेच विठ्ठल हा संत नामदेवांच्या सुखदु:खाशी, आशाआकांक्षासी एकरुप होतो, त्यांचा सखा बनतो, त्यांच्या मनात देवाविषयीचा एक विश्वासच जिव्हाळा उत्पन्न करतो, अशीही जाणी निर्माण केली आहे. भोळ्याभाबड्याा भक्तांचा कैवारी असणारी प्रतिमा नामदेवांनी उभी केली आहे.

***समारोप :—***

असे हे थेर संत श्री नामदेव महाराज यांच्या अभंगातून विठ्ठलभक्तीचा हा थोडक्यात घेतलेला परिचय आहे. भक्तीच्या बळावर समाजात नवचैतन्य ओतण्याचे काम नामदेवांनी केले आहे. नामदेवाची भक्ती नम्र, प्रेमळ, वत्सल, भोळीभाबडी व संवेदनाक्षम आहे. तसेच त्यांच्या भक्तीला ज्ञानाची व अध्यात्माची जोड लाभलेली आहे. आज समाजात घडणारी विकृती कमी करायची असेल तर विद्यार्थ्यांना संत साहित्याच्या अीयासाची गरज आहे, असे वाटते. त्यामुळे थोड्याा फार प्रामाणात का होईना सांस्कृतीची जपणूक होईल.

***:: संदर्भ ग्रंथ ::***

नामदेवांची अभंगवाणी—(संपादक)—डॉ. इनामदार, डॉ. मिरजकर, प्रा.रेळेकर.
भक्तीशोभा — विकास खोले
श्री. संत नामदेव जीवन आणि कार्य — रा. शी. वाळिंबे
अर्वाचिन मराठी वाङ्मयाचा इतिास — ल.रा. नसिराबादकर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org